# <u>फसवणुकीपासून सावधान!</u>

कॉर्पोरेट नियुक्ती फसवणुकीच्या प्रकरणांचे प्रमाण वाढले आहे आणि गेल्या काही वर्षात त्यांची व्याप्तीसुद्धा वाढली आहे. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि त्यांच्या ग्रुप कंपन्यांच्या निदर्शनास आले आहे की, रोजगार मिळविण्यासाठी इच्छुक असलेल्या व्यक्तींना गाठून काही ठग त्यांना आमच्या समूह कंपन्यांमध्ये चांगल्या पगाराची नोकरी लावून देण्याचे आश्वासन देत आहेत. संभाव्य अर्जदाराचा विश्वास संपादन केला की, प्रत्यक्ष नेमणूक किंवा मुलाखतीसाठी निश्चित रक्कम भरणे अनिवार्य असल्याचे सांगून हे ठग त्यांना एका विशिष्ट बँक खात्यात रक्कम जमा करण्यास सांगत आहेत.

- **त्यांची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे आहे :** सुरुवातीची मागणी **कमी रकमेची** असते, जेणेकरून संबंधित व्यक्ती सतर्क होऊ नये आणि पुढील मार्ग सुरळीत व्हावा.

- एकदा संभाव्य रोजगार इच्छुक व्यक्तीने प्रतिसाद दर्शवला की मुलाखतीची वा नेमणुकीची तारीख जवळ आली असता **भामटा हळूहळू रक्कम वाढवतो**.

- त्याचप्रमाणे **प्रारंभिक स्टार्ट-अप किटसाठी, उदा. लॅपटॉपसारख्या वस्तू उपलब्ध करून देण्यासाठी हे ठग मोठी रक्कम मागत** असल्याचेही निदर्शनास आले आहे.

- पैशाची मागणी करण्यासोबतच अर्जाची प्रक्रिया करण्यासाठी हे ठग **वैयक्तिक माहितीची** मागणीही करत असल्याचे या प्रकरणांमध्ये दिसून आले आहे. ही माहिती त्यानंतर बाजारात विकली जाते.

**या फसवणुकीपासून सतर्क राहण्यास करण्यात येणाऱ्या आवाहनाच्या माध्यमातून संभाव्य रोजगार इच्छुक व्यक्तींना आम्ही सावधान करू इच्छितो की, रिलायन्स इंडस्ट्रीज किंवा ग्रुप कंपन्या :**

- **रोजगार देण्यासाठी आणि मुलाखतींसाठी किंवा प्रारंभिक स्टार्टअप-किट जसे की, लॅपटॉप/गणवेश उपलब्ध करून देण्यासाठी किंवा कोविड-19 चाचणीसाठी रोजगार इच्छुक व्यक्तींकडून कोणतेही शुल्क आकारत नाही किंवा कोणत्याही प्रकारची अनामत रक्कम आकारली जात नाही.**

- **आमच्या वतीने कोणत्याही उमेदवाराला रोजगाराच्या ऑफर किंवा लाभ देण्यासाठी एजंट, एजन्सी किंवा व्यक्तीची नियुक्ती करत नाहीत.**

- **गुणपत्रिका, पॅन कार्ड, आधार कार्ड, सीव्ही इत्यादी वैयक्तिक दस्तऐवज व्हॉट्सॲपच्या माध्यमातून शेअर करा किंवा ऑनलाईन अर्ज भरा असे सांगितले जात नाही.**

- **जीमेल, याहू, हॉटमेल, आउटलूक इत्यादींसारख्या वैयक्तिक ईमेल अ‍ॅड्रेसचा वापर करून संपर्क साधत नाहीत. रोजगाराशी संबंधित सर्व औपचारिक संपर्क @ril.com. @Jiobp.com ने शेवट होणाऱ्या ईमेल अ‍ॅड्रेसवरून करण्यात येतो.**

- **जिथे एखाद्याला एसएमएस पाठवावे लागतील अशा स्वरूपाची कोणतीही नोकरी उपलब्ध करून देण्यात येत नाही.**

कोणताही नोकरी इच्छुक उमेदवार, जर अशा एजन्सी, नोकरीची वेबसाईट किंवा व्यक्ती यांच्या बरोबर व्यवहार करत असेल तर ती संपूर्णपणे त्या उमेदवाराची जबाबदारी राहील आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड किंवा त्यांच्या समूह कंपन्या अशा कार्यपद्धतीत, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या झालेल्या, कोणत्याही नुकसानाला, जबाबदार राहणार नाही.

एखाद्या रोजगार इच्छुक व्यक्ती स्वत:च्या ऑफर लेटरची पडताळणी/ सत्यमापन हे रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, रिटेल किंवा जिओ, जे लागू असेल त्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन करू शकते.

जर उमेदवार भरतीची, अशा प्रकारची कोणतीही संशयास्पद कार्यपद्धती कोणाला आढळून आली तर ती त्यांनी आमच्या 'हेड – फ्रॉड अँड मिसकंडक्ट इन्व्हेस्टिगेशन' (प्रमुख - फसवणूक आणि गैरवर्तन तपास) यांच्याशी recruitment.fraud@ril.com या ईमेल अ‍ॅड्रेसवर संपर्क साधावा.